सामना उत्सव रविवार पुरवणी
गुरुजी
शोध

# कर्मयोगिनी तुळस

## विज्ञानाच्या पायावर आधारलेली तुळशीच्या पूजेची प्रथा ही आपल्याच कुटुंबाच्या हिताची असून तुळशीला रोज आदरपूर्वक केलेला नमस्कार आणि दिलेल्या प्रयोगाद्वारे तिचे केलेले पालन हे प्रत्येकाने अंगीकारावे असेच आहे.

श्री विष्णूंच्या गळ्यात रुळणाऱ्या तुळशीचे आपल्या प्राचीन हिंदू संस्कृतीने अनन्यसाधारण महत्त्व सांगितले आहे. आधुनिक विज्ञानाच्या माध्यमातूनही तुळशीचा वातावरणशुद्धीच्या दृष्टीने असणारा उपयोग सिद्ध झाला आहे. नोबेल पारितोषिक विजेते हिंदुस्थानी वनस्पती शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस यांच्या ‘प्लाण्ट ऑटोग्राफ’ या ग्रंथात तुळशीच्या उपयुक्ततेबद्दल स्वतंत्र उल्लेख आहे. म्हणूनच अविरतपणे ऑक्सिजनचा पुरवठा करणाऱ्या तुळशीचे एक तरी रोप प्रत्येक कुटुंबाने घरात लावले पाहिजे.

आपल्याकडे घराच्या पूर्वद्वाराला तुळशी वृंदावन असण्याची पूर्वापार रूढी आहे. या रूढीमागे असलेले विज्ञानही आज वनस्पतीशास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे. तुळस ही एक अशी वनस्पती आहे जी माणसांच्या विचारांमुळे निर्माण झालेल्या मत्सरादि लहरी शोषण करून घेते. घराच्या द्वाराजवळ तुळस लावण्याच्या पूर्वापार प्रघातामुळे घरात प्रवेश करणाऱ्या किंवा घरातून बाहेर जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात त्या कुटुंबाबद्दलचे किंवा त्या घराबद्दलचे जे काही मत्सरयुक्त विचार असतील ते जास्तीत जास्त शोषून घेण्यास मदत होत असे. बॉम्ब शोधून काढणाऱ्या मेटल डिटेक्टर उपकरणाप्रमाणेच तुळस हे एक ‘मत्सर डिटेक्टर’ उपकरण आहे, परंतु मेटल डिटेक्टरला आपले काम करण्यासाठी बॅटरी किंवा विजेची आवश्यकता असते त्याचप्रमाणे तुळशीला आपल्या कृतज्ञतेच्या वंदनाची आवश्यकता असते. त्याकरिताच आपल्या पूर्वसुरींनी तुळशीची रोज पूजा करण्यास सांगितले आहे. आपण आपल्या घरातल्या तुळशीला जेवढे आदराचे उत्तम स्थान देऊ तेवढ्या समर्पित भावनेने ही निष्काम कर्मयोगिनी आपल्या कुटुंबाच्या हितासाठी त्याग करील हे प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे. अतिशय कमी पाण्याची गरज असणारी तुळस सततच्या वाईट विचारांच्या ग्रहणामुळे अशुद्ध होत राहते आणि एक दिवस ‘कृष्ण’ म्हणते. कारण शेवटी तिच्याही क्षमतेला मर्यादा असतात आणि मग आपण म्हणतो की ती द्वारकेला गेली.

दूषित विचारलहरींच्या सततच्या शोषणाने तुळशीवर होणारे दुष्परिणाम कमी करण्याचा एक सोपा उपाय आहे. जिथे सतत सत्कर्म केली जातात, नामजप, नामस्मरणासारखी साधना घडते अशा स्थळांना आपल्याकडे तीर्थक्षेत्र म्हटले जाते. सततच्या सत्कर्मामुळे वातावरणात निर्माण झालेल्या चांगल्या विचारांच्या लहरींनी या स्थळांमधील माती आणि पाणी दोन्ही शुद्ध झालेले असते. घरातल्या तुळशीवृंदावनातील थोडी माती अशा पवित्र तीर्थक्षेत्रामध्ये नेऊन तेथे जर काही साधना, नामस्मरण करून सुसंस्कारित केली व त्यातील काही त्या स्थानावर ठेवून तिथली थोडी माती जर आपण आपल्या घरातल्या तुळशीत टाकू शकलो तर वाईट विचारांच्या संपृक्तीमुळे तुळशीचे कमी होणारे आयुर्मान आपण निश्चितपणे वाढवू शकतो. मातीच्या आदान-प्रदानाचे हे चक्र सरासरी दोन ते तीन महिन्यांतून एकदा केले तरी पुरेसे असते आणि अगदी चिमूटभर मातीसुद्धा विचारांच्या शुद्ध-अशुद्ध लहरींचे वहन करण्यासाठी सक्षम असते. सारांशाने विज्ञानाच्या पायावर आधारलेली तुळशीच्या पूजेची प्रथा ही आपल्याच कुटुंबाच्या हिताची असून तुळशीला रोज आदरपूर्वक केलेला नमस्कार आणि दिलेल्या प्रयोगाद्वारे तिचे केलेले पालन हे प्रत्येकाने अंगीकारावे असेच आहे.

(वासुदेव वामन बापट गुरुजी हे ओम सद्गुरू प्रतिष्ठानच्या बोरिवली, बदलापूर, खोपोली येथील स्थानांवर गरुपदी आहेत.)

- वासुदेव बापट